नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २७/०६/२०२४ (गुरूवार) सकाळ

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपींना पारशिवनी पोलीसांनी केले अटक

पोस्टे पारशिवनी अंतर्गत मौजा बखारी शिवारातील बखारी ते मेहंदी रोड वरील नाल्याचे पुलावर दिनांक २५/०६/२०२४ चे ०७/०० वा. ते दि. २६/०६/२०२४ रोजी यातील फिर्यादी नामे– खुशाल नामदेव ठाकरे, वय ६८ वर्ष, रा. येसंबा नांदगाव ता. पारशिवनी यांचा मुलगा निखील खुशाल ठाकरे, वय ३५ वर्षे यास **आरोपी नामे–१) नागेश्वर विठ्ठल ठाकरे वय ४५ वर्षे रा. नांदगाव येसंबा ता. पारशिवनी २) मंगेश पिलाजी शिवनकर, वय ३४ वर्षे, रा. नांदगाव येसंबा ता. पारशिवनी** यांनी अज्ञात कारणावरून एखादया धारधार हत्याराने गळा कापुन जिवानीशी ठार केले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून आरोपींविरूद्ध पोस्टे पारशिवनी येथे कलम ३०२ भादंवि अन्वये गुन्हा नोंद असुन आरोपीतांना पारशिवनी पोलीसांनी येसंबा शिवारातून ताब्यात घेतले. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि संघमित्रा बांबोडे या करीत आहे.

सदरची कारवाई ही, मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक, ना ग्रा, मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे पारशिवनी येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक थोरात, पोउपनि शिवाजी भताने, पोहवा मुदस्सर जमाल, पोशि पृथ्वीराज चव्हान, राकेश बंधाटे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर